ISSN 18-19

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

# D.P. Bhosale College, Koregaon

Tal. Koregaon, Dist. Satara (MS), INDIA
(Affiliated to Shivaji University, Kolhapur)
**NAAC Re-accredited 'A' Grade (CGPA 3.12)**
**ISO 9001:2015 Certified**

Impact Factor - 6.261

ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

March -2019 Special Issue - 171 (D)




आंतरविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद स्मरणिका

## घुमंतू समाज की श्रमसंस्कृति : कला और साहित्य

अतिथी संपादक
डॉ. विजयसिंह सावंत
प्राचार्य
डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव
ता.कोरेगाव, जि. सातारा

मुख्य संपादक
डॉ. धनराज धनगर (येवला)

कार्यकारी संपादक
डॉ. गजानन भोसले
प्रमुख, हिंदी विभाग
डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव
ता. कोरेगाव, जि. सातारा

सहयोगी संपादक
श्रीमती आर. के. मुल्ला
सहाय्यक प्राध्यापिका, हिंदी विभाग
डी.पी.भोसले कॉलेज, कोरेगाव
ता. कोरेगाव, जि. सातारा

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | | |
|---|---|---|---|
| 30 | 'उपरा'मधील स्त्रियांची व्यथा – वेदना | डॉ.मानसी जगदाळे | 143 |
| 31 | विविध भटक्या विमुक्त जमाती आणि स्त्रीजीवन | डॉ.राजेंद्र खंदारे | 147 |
| 32 | धनगर समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी : एक अभ्यास | कु.वर्षा तांदळे व प्रा.बाळासाहेब चव्हाण | 152 |
| 33 | 'विराड' आत्माकथनातील भटक्या स्त्रियांचे जीवन | बापूराव वऱ्हाडे | 157 |
| 34 | भटक्या विमुक्तांच्या कला | प्रा.सौ.विजया पवार | 161 |
| 35 | भटक्यांची आत्मकथनातील समाजबोली व सांकेतिक भाषा | प्रा. विजया पाटील | 166 |
| 36 | कोल्हाटी समाजजीवनाची जडण-घडण | डॉ.विलास धनवे | 171 |
| 37 | भटक्या – विमुक्तांचा इतिहास व स्त्रियांची स्थिती | विना गुलदेकर | 174 |
| 38 | भटक्या विमुक्त जमाती-समाज आणि संस्कृती | वैशाली चौगुले | 179 |
| 39 | भटक्या – विमुक्तांचे साहित्य व स्वरूप | सुरेखा व्हसमने | 188 |
| 40 | भटक्यांचे आत्मकथन (भूक, भीक व भटकंती) | सारिका दळवी | 192 |
| 41 | भटक्या – विमुक्तांचे साहित्य व स्वरूप | सुरेखा इंगळे | 196 |
| 42 | भटका - विमुक्त समाज : शैक्षणिक व सांस्कृतिक समस्या | डॉ. प्रभाकर पवार | 200 |
| 43 | भटक्या – विमुक्तांचे अंतरंग व स्वरूप | प्रा.विपीन वैराट व डॉ. बाळासाहेब चव्हाण | 203 |
| 44 | गावनवरी - स्त्रीवादी जाणिवेची बंडखोर कविता | भारती सोनवणे | 209 |
| 45 | स्त्रीवादी साहित्य – संकल्पना स्वरूप व व्याप्ती | डॉ. गीता येर्लेकर | 218 |
| 46 | डोंबारी जमातीच्या समस्या व स्थिती : एक भौगोलिक अभ्यास | प्रा. शिवाजी चव्हाण | 221 |
| 47 | कैकाडी समाजाचे प्रभावीचित्रण करणारे आत्मकथन : 'उपरा' | कमल दनाने | 228 |
| 48 | गोसावी जमातीची शोकांतिका | प्रा. लालासाहेब चव्हाण | 232 |
| 49 | मराठी साहित्यातील भटक्या – विमुक्तांचे प्रतिबिंब | प्रा. ज्ञानेश्वर म्हात्रे | 243 |
| 50 | भटक्या - विमुक्तांच्या साहित्यातील स्त्री आत्मकथने | डॉ. निर्मला मोरे | 247 |
| 51 | भटक्या-विमुक्तांचे परिवर्तन चळवळ आणि नेतृत्व | डॉ. तातोबा बदामे | 252 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Editor***

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 171 (C)- भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
March -2019

# भटक्या विमुक्तांचे अंतरंग व स्वरूप

**प्रा. विपीन नारायण वैराट.**
(एम. ए. एम. फिल, सेट.)
शंकरराव जगताप आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज,
वाघोली,विद्यानगर.
ता. कोरेगाव, जि. सातारा.
मो. ६२०६३००३६५.

प्रा. डॉ. बाळासाहेब संतू चव्हाण.
(एम. ए. एम. फिल, पीएच. डी.)
प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,
डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव,
ता. कोरेगाव, जि. सातारा.
मो. ६५०३४६०६६७.

**प्रस्तावना :–**

परंपरागत वर्ण व्यवस्थेतून उद्भवलेल्या जातीं व्यतिरिक्त व्यवसायावर आधारित जाती व त्यांच्या अंतर्गत अनेक पोटजाती – उपजाती निर्माण झाल्या. हया पोटजातींच्या संख्या आज वाढताना दिसते आहे. पंडित जवाहरलाल नेहरू त्यांच्या Discovery of India या पुस्तकात लिहितात की, "पारंपारिक भारतीय समाज हा तीन संकल्पनांवर आधारित होता. स्वतंत्र गावगाडा, जात व एकत्र कुटुंब पद्धती" अनेक जाती, भाषा, संस्कृतीतील विविधता हे संपूर्ण जगात भारताचे वैशिष्ट्ये ठरते आहे. भारतात आर्यांचे आगमन होण्यापूर्वी या देशात द्रविड वंशाचे लोक राहत होते. पुढे आर्य व अनार्य असा संघर्ष उभा राहत गेला. जस जसे पशुधन मनुष्यबळ व संपत्ती वाढत गेली तसे तसे संघार्षाचे स्वरूप वाढत गेले. आर्यानी द्रविडांशी संघर्ष केल्यानंतर आर्यांच्या हल्लेंमुळे द्रविड लोक रानावनात पळून गेले. जंगलाच्या द–या खो–याचा आश्रय घेऊन त्यांनी आपला उदरनिर्वाह सुरू केला. जंगलातून व डोंगरातून भटकंती करीत राहिले.

" तेराव्या षतकात अशा लोकांना राजे लोकांचा आश्रय मिळाला. इ. स. १७५७ मध्ये प्लासीची लढाई झाली. कंपनी सरकार संपुष्टात आले. देशाचा कारभार ब्रिटीश लोकांच्या हातात गेला. हेच लोक देशाचे राज्यकर्ते झाले. त्यांचा अमंल सुरू झाला. गुल्हेगारांचे प्रश्न वाढतच गेले. त्यामुळे काही निरपराध लोकांचा छळ होऊ लागला. इ.स. घ"ऋघ मध्ये या देशात गुन्हेगारी कायदा लागू करण्यात आला. तब्बल "घ वर्षे हा कायदा अस्तित्वात होता. या कायद्याखाली इंग्रज सरकारने देशातील १९८ जाती–जमातीच्या लोकाना गुन्हेगार म्हणून जाहीर करण्यात आले होते. या गुन्हेगारी जाती–जमातीच्या लोकांना तीन तारेच्या कुंपणाने ८१ वर्षे डांबण्यात आले होते. अशा प्रकारच्या माणसांचे तुरूंग त्यांना त्या काळात 'सेंटल मेंट' असे म्हटले जात होते. अशी एकूण ह्रह्र'सेंटल मेंट' वेगवेगळ्य राज्यात निर्माण करण्यात आली होती. " [१]

पुढे १९४७ ला भारत देश स्वतंत्र झाला. देशाचे पहिले पंतप्रधान पंडीत नेहरू यांनी आपल्या कारकिर्दीत १९५२ मध्ये सदर समाजाचा अभ्यास केला. त्यांच्या प्रश्नांवर सामाजिक, स्थितीवर विचारांअंती एक महत्वपूर्ण निर्णय घेतला तो म्हणजे इंग्रजांनी आज पर्यंत ज्या कायद्याद्वारे अमानवी पातळीवर समाजाची पिळवणूक चालली होती ती आमंलात आणलेला गुन्हेगारी कायदा रद्द केला आणि तीन तारेच्या कुंपणात बंदिस्त केलेल्या घ४" जाती–जमातींना मुक्त करण्याचे आदेश दिले. तेव्हा पासून ते विमुक्त झाले. म्हणून त्यांना ' विमुक्त ' असे संबोधले जाऊ लागले. पण दुर्दैवाने त्यांच्या नशिबी भटकांतीच राहिली. इथल्या व्यवस्थेने त्यांना स्थिर जगूच दिले नाही. आपले पोट भरण्यासाठी रोजच्या गरजा पूर्ण करण्यासाठी भटकंती करीत राहिले.

"महाराष्ट्रात एकूण ४० भटक्या विमुक्त जाती–जमातींपैकी १३ विमुक्त व २७ भटक्या–जाती–जमाती अशी त्यांची विभागणी करण्यात आली होती. आज भटक्या जातीमध्ये धनगर, वंजारी, भारतीय इराणी, गिहारा व कडक लक्ष्मीवाले इ. पाच जमाती शासनाने समाविष्ट केल्याने भटक्या–विमुक्त जाती–जमातींची एकूण संख्या ४५ इतकी झाली आहे.

२ फेब्रुवारी २००१ मध्ये महाराष्ट्र शासनाने ' भटक्या ' व ' वडार ' या विमुक्त जातीमध्ये अनुक्रमे 'गुसाई' (गोसाइ) व 'मुस्लीम ' बेलदार ' या तत्सम जातीचा समावेश केला असून ' भंडारी ' व ' गारूडी ' या भटक्या जातीमध्ये अनुक्रमे नाथ, जोगी, नाथपंती व मुस्लिम, मदारी, गारूडी, सापवाले व जादूगार या तत्सम जातींचा समाविष्ट केला आहे. 'बहूरूपी' व 'ओतारी' या भटक्या जातीमध्ये अनुक्रमे बोहरशी, बहुरूपिया, भोरपी, रायरंध, अय्यार, अय्यारी व वतकर, वतकरी, वतनकर, वतोकर, औतकरी, ओतारी या तत्सम जातींचा समावेश करण्यात आला आहे. 'सिक्कलगार' च 'धनगार' या भटक्या जातीमध्ये अनुक्रमे शीख, शीकलीगार व डंगे धनगार, डोंगरी धनगर, या तत्सम जाती 'जोशी' या भटक्या जमातीमध्ये 'सरोदीया' या तत्सम जातीचा समाविष्ट करण्यात आला आहे."[२] अशा भटक्या जातीमध्ये 'नंदीवाले' या जातीचा समावेश केला असून या समाजाची लोकसंख्या महाराष्ट्रात लक्षणीय आहे.

**भटके शब्दाची संकल्पना :–**

भटके या शब्दाची माहिती कोशामध्ये (नोमॅड) असा उल्लेख येतो. उदरनिर्वाहाकरिता निवडलेल्या अगर वाटयास आलेल्या व्यवसायानिमित्त अगर उदरनिर्वाहाच्या साधनांच्या शोधार्थ भटकत राहणा–या लोकांना भटके म्हणतात. इंग्रजीत त्यांचा उल्लेख 'नोमॅड्स' असा करतात. नोमॅड हा शब्द 'नोमी' किंवा 'नेमो' (गुरे चारणे) या ग्रीक शब्दापासून तयार झालेला आहे. स्वतःचे कायम स्वरूपाचे घर किंवा शेत जमीन नाही: परंतु गुरांचे कळप आहेत, असे लोक गुरांसाठी चराऊ कुरणांच्या शोधार्थ सतत भटकत असतात. अशा लोकांना उद्देशून 'नोमॅड' हा शब्द वापरला जातो. हा शब्द किंवा संकल्पना फक्त जंगलात भटकणा–या लोकांसाठीच वापरली जात नाही, तर एकाच ठिकाणी कायमचे वास्तव्य न करता सतत भटकंती करणा–या लोकांसाठी ती वापरली जाते. खेचरे, गाढवे, तट्टू, घोडे, उंट इत्यादींवर आपली मालमत्ता लादून स्वतःच्या इच्छेनुसार किंवा परिस्थितीच्या दडपणामुळे चांगली उपजीविका होऊ शकेल, अशा ठिकाणांच्या शोधात असे लोक सतत स्थलांतर करीत राहतात, डोंबारद–याचे खेळ, भविष्य कथन, किरकोळ व्यापारी, कारागिरी, वेद्यकी इत्यादी व्यवसाय ते करतात. सतत भटकणा–या समूहांव्यतिरिक्त काही समूह हे अर्ध–भटके जीवन जगतात. अशा समूहांजवळ स्वतःचे घर किंवा थोडीफार शेतजमीन असते आणि शेतीचा हंगात संपल्यानंतर जेथे उदरनिर्वाहाकरिता लागवडीला योग्य अशी जमीन उपलब्ध असेल, तेथे कुटुंबियांसह आणि सामानासह ते स्थलांतर करतात. हंगाम संपल्यानंतर ते आपल्या मूळ ठिकाणी येतात. 'भटका' या शब्दाविषयी मत मांडताना रामनाथ चव्हाण आपल्या 'जाती आणि जमाती ' या पुस्तकात म्हणतात, "ज्यांना वेशीच्या आतल्याही जगात स्थान मिळाले नाही आणि वेशीच्या बाहेरही जे स्थिर होऊ शकले नाही, परंतु आतल्या आणि बाहेरच्या लाकांच्या आश्रयाने वर्षानुवर्षे आपली उपजीविका करीत राहीले. तरीही इथल्या जाती–व्यवस्थेचे जे अविभाज्य घटक आहेत. असे 'भटका' आणि 'विमुक्त' या नावाने ओळखतात."[३] तर डॉ नागनाथ कदम यांनी " नाव सांगायला स्वतःचे गाव नाही. राहायला घर नाही. जमिनीसारखे कायम स्वरूपाचे उत्पन्नाचे साधन नाही. उपेक्षित जगणे नशिबी असल्यामुळे पोट भरण्यासाठी कामाच्या निमित्ताने जगणारा अथवा परंपरेने चालत आलेल्या कलेच्या आधाराने स्वतःची

उपजीविका करणारा लोकसमूह अनेक वर्षापासून महाराष्ट्रात वेगवेगळया जाती–जमातींच्या नावाने जीवन जगतात. अशा लोक समूहाला 'भटके' असे म्हणतात."[४]

भटक्या जाती–जमातींचे जीवन दर्शन :–

भटक्या जाती–जमाती सुगीच्या दिवसात पोटाच्या उदनिर्वाहासाठी गावोगावं भटकंती करीत असतात. काही जाती–जमातींना वतनदार म्हणून गावेच्या गाव दत्तक दिलेली असतात. सुगीच्या दिवसात अशा गावाचे मनोरंजन करणे, तिथली कामे करणे, जमेल तसे, लागेल तसे माल विकणे आणि उदरनिर्वाह करणे. मात्र हयांची पालं मुख्य गावाजवळ न राहता गावापासून ब–याच अंतरावर उभी केली जातात. भटकणा–या जाती–जमाती नुसार हया पालांची रचना असते. पालावरून हया जाती–जमाती ओळखता येऊ शकतात. त्यामुळे उपजिवेकेसाठी भटकंती करणारा समाज आज ही एका गावात स्थिर झालेला दिसत नाही. त्याच्या नशिबी भटकंती आलेली दिसते. गावात काम करायचे, कष्ट उपासायचे तरीपण कायमस्वरूपी घर नाही, गावं नाही त्यामुळे शिक्षणापासून आजदेखिल हा समाज वंचित असल्याचा दिसतो. त्यामुळेच दारिद्रय, पराकोटीचा अज्ञानी, टोकाचा अंधश्रद्धाळू आणि सामाजिकदृष्टया मागासलेला राहिलेला आहे.

महाराष्ट्रात भटक्या आणि विमुक्तांच्या एकूण पंचेचाळीस जाती–जमाती असल्याचे मानले जाते. त्यांच्या पोटजातींची संख्या दोनशे ते दोनशे पन्नासच्यावर आहेत. या सर्व जाती–जमाती स्वत:ला इतर जाती–जमातींपेक्षा वेगळे समजतात. त्यांच्या राहणीमानात, पोषाखात, भाषेत, व्यवसायात, देवदेवतांमध्ये, सण–उत्सवांमध्ये, विवाह पद्धतींमध्ये, अत्यं विधींमध्ये, दागदागिण्यांमध्ये कमालीचे वेगळेपण आहे. हया विविधतेमुळे एखादी भटके जमाती दुस–या भटक्या जाती जमाती पासून वेगळे असल्याचे ओळखून येते. आपले जगणे, भटकंती केवळ दैवी संकेताने मिळते असे ते मानतात. भटक्या समाजात नंदीवाले समाज किंवा ही जात स्वत:लाच उच्च कुलीन समजतात.

जात पंचायत :–

भटक्या विमुक्त जाती–जमातीची 'जात पंचायत' न्याय संस्थेचे काम करताना दिसते. ही जात पंचायत परंपरेने चालत आलेली दिसते. म्हणूनच तिच्याकडे 'न्यायसंस्था' म्हणून पाहिले जाते. त्यामुळे हया जात पंचायतीचे स्वत:चे असे अलिखित नियम असतात. आणि ते नियम, कायदे व संकेत तंतोतंत पाळण्यात येतात. प्रत्येक जमाती हया हे नियम–कायदे पाळण्यात धन्यता मानतात. एखाद्या प्रकरणात व्यक्तीला शिक्षा झाली तर तो कोणत्याही प्रतिकाराशिवाय ती शिक्षा स्विकारतो. आजच्या काळामध्ये हया प्रक्रियेत बदल होत असला तरी तिचे मुळ रूप टिकून आहे. सुरूवातीच्या काळात ज्यांच्याकडे पैसा आहे असे लोक जात पंचायत सभासद असत. पुढे पुढे हे वंशपरंपरागत पद्धतीने जात पंचायत सभासदत्व मिळू लागले. जात पंचायतीमध्ये आता अलौकीक शक्तीच्या नावाने शपथ घेतली जाते. "अलौकीक शक्तीला आवाहन करून त्या शक्तीच्या नावाचा उच्चार करणे हे त्यांना भयंकर जड जाते. त्यामुळे ते खोटी शपथ घेत नाहीत. आपल्या संसारावर दैवी कोप होईल, आपणास वाईट दिवस येतील असे त्यांना वाटते. त्यामुळे त्यांच्या देवतांना आवाहन करून विधीपूर्वक शपथ घेण्यास गुन्हेगार तयार होत नाही."[५] जर गुन्हाच केला असेल तर जात पंचायती समोर शपथ घेण्याच्या भीतीने तो गुन्हा कबूल केला जातो. आणि जात पंचायत गुन्हाप्रमाणे त्याला शासन करते. कधी कधी वादी प्रतिवादांना आपले हुकुमाप्रमाणे वागावे लागते. काही दिव्य त्यासाठी करावी लागतात. उदा. – उकळत्या तेलाच्या भांडयातील तळाचे पैसे काढणे वगैरे.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 171 (C)- भटक्या विमुक्तांच्या श्रमसंस्कृतीचे कला व साहित्यातील प्रतिबिंब | March -2019
UGC Approved Journal

व्यक्तीचे समाजातील व्यवहार व्यवस्थित चालविण्यासाठी नियम अगर कायदे यांचे पालन करणे आवश्यक असते. समाजात अस्थिरता निर्माण करणा–या व्यक्तींना योग्य मार्गावर आणणे व अस्थिरता निर्माण करणा–या व्यक्तीच्या मनात दहशत निर्माण करणे हे जात पंचायत काम करीत असते.

**पोषाख :–**

देशामध्ये विविध भटक्या विमुक्त जाती–जमाती आहेत. त्यांच्या पोषाखात त्या त्या जाती–जमातीनुसार वेगळेपण दिसून येते. जसा प्रदेशामध्ये बदल होतो. वातावरणात बदल होतो. तसाच त्यांच्या पोषाखात बदल दिसून येतो. सर्वांचा एकसारखा पोषाख असत नाही. कारण प्रत्येक भटक्या विमुक्त जाती–जमातीचे रीतीरिवाज विभिन्न आहेत. त्यांचे सण–उत्सव भिन्न आहेत. त्यांचे व्यवसाय भिन्न आहेत. त्यामुळे साहाजिकच त्यांनी परिधान करत आलेल्या पोषाखातसूद्धा विविधता आढळताना दिसते. तरीसुद्धा हया देशभरातील भटक्या विमुक्त जाती–जमातीच्या लोकांचा पोषाखाचे वेगळेपण लक्षात आल्याशिवाय राहत नाही. वासुदेव, नंदीवाले, कैकाडी, वडार इत्यादी नंदीवाल्यांचा पोशाख म्हणजे डोक्याला पंचरंगीत फेटा बांधलेला असतो. त्याचा शेमला कमरेपर्यंत सोडलेला असतो. अंगामध्ये अंगरखा त्यावरच जुन्या कापडाचा बाजारातून आणलेला कोट चढवलेला आढळतो. खाली धोतर नेसलेले असते. वासुदेवांच्या अंगात घोळदार अंगरखा, गळयात दोन्हीकडून सोडलेला तांबडया रंगाचा शेला असतो. डोक्यावर मोरपिसांच्या शंकूच्या आकाराची टोपी असते. पायात घुंगराचे चाळ आणि कमरेला बांधलेल्या शेल्यात बासरी खोचलेली असते. काखेत झोळी अडकवलेली असते. तर कैकाडी पुरूष गुडघ्यापर्यंत धोतर नेसतात. अंगात छाटन किंवा बनियन घालतात. डोक्याला फेटा अथवा टोपी घालतात. स्त्रिया अंगात चोळी किंवा झंपर घालतात. साडी नेसून कासोटा घालतात. पोषाखांमुळे त्यांच्यात विविधता दिसून येते. फासेपारधी, लमाणी, कंजारभाट यांच्या विशिष्ट पोषाखावरून, दागिन्यांवरून ते ओळखून येतात. तर गोल्ला जाडे भरडे धोतर व अंगात सुती सदरा किंवा गंजीफ्रॉक परिधान करतात. डोक्यावर साधा फेटा असा असतो. अंगावर एक साधे उपरणे असते. स्त्रियांचा पोषाख नऊवारी लुगड. म्हातारी स्त्री असेल तर चोळी घालने. हातात कंकणे असतात. हातावर व कपाळावर गोंदण हे बहुतेक जमातींमधील स्त्रीयांच्या मधील साम्य बाब ठरते.

**सांस्कृतिक जीवन :–**

भटक्या विमुक्त जाती–जमातीमध्ये ज्याप्रमाणे पोषाखात विविधता आढळते त्याचप्रद्धतीने त्यांच्या सण समारंभ व देवदैवतांमध्ये देखील विविधता आढळते. वृक्ष, प्राणी, यांना दैवत्व बहाल करण्याची भारतीय दृष्टी हय जाती–जमातींनी स्विकारलेली दिसते. वड, पिपळ, रूई, तुळस, बेल इत्यादी वृक्षांची पूजा केली जाते. तर गाय, बैल, कुत्रा, नाग यांसारख्या प्राण्यांचे पूजन ही काही जाती जमातींमध्ये केली जाते. खंडोबा, बिरोबा, सोनाराचा काळभैरव, जेजुरी, पालीचा खंडोबा, चिंचणीची मायाक्कादेवी इत्यादी ठिकाणाच्या देवदेवतांच्या यात्रा व जत्रा होतात. त्या साज–या करण्यामध्ये हय जाती जमाती रस घेतात. नागपंचमी, रंगपंचमी, दसरा, दिवाळी, गुढीपाडवा यांसारखे सण कमी अधिक प्रमाणात साजरे करतात.

विवाह पद्धतीचा विचार करताना असे जाणवते की, अन्य जाती–जमातींच्या पेक्षा भटक्या विमुक्त जाती–जमातीत कुळानुसार सोयरीक संबंध जुळविले जातात. नंदीवाले, कैकाडी, फासेपारधी, लमाणी, कोल्हाटी, गोपाळ ढवळा कंजार भाट इ. जाती–जमातींमध्ये आजही वधूपक्षाला दैज (हुंडा) देण्याची प्रथा रूढ असल्याचे दिसून येते. या जाती–जमातीमध्ये विवाह विधी ब्राह्मण, पुरोहिताशिवाय पार पडला जातो. त्या त्या जातीचे भटजी त्या जाती–जमातीत असतात. विवाह विधी तेच पार पाडतात. काही जाती–जमातींमध्ये बहु पत्नीत्वाची प्रथा आजदेखील पाहायला मिळते. घटस्फोटीत महिलेला पुर्नविवाहाची मुबा दिलेली दिसते. जात पंचायत

मान्यता असल्याशिवाय भटक्या विमुक्त जाती–जमातीत वधू–वरांची लग्ने होत नाही. जातीबाहय विवाहाला मान्यता नाही. सोयरीक जमविताना कुळाचा व गोत्राचा विचार केला जातो.

अंत्यविधीचे स्वरूप भटक्या–विमुक्त जाती–जमातींमध्ये भिन्न स्वरूपात आहे. मयत झाल्यानंतर प्रेत दफन किंवा दहन करण्याची प्रथा जाती–जमातींमध्ये आहे. प्रेत वाहून नेण्यासाठी झोळीचा तर कोणी तिरडीचा उपयोग करतात. काही जाती–जमातीत माती सावडण्याच्या दिवशीच उत्तरकार्य उरकून घेतात. लोकांच्यावर लिंबाच्या डहाळयाच्या साहाय्याने गोमूत्र शिंपडणे, सुतक तिस–याच दिवशी फेडणे हया प्रथा दिसतात. वर्षश्राद्ध घालण्याची प्रथा काही जाती–जमातीमध्ये दिसून येते. वर्षेश्राद्ध पुरूषाचे असेल तर बोकड व स्त्रीचे असेल तर पाट कापण्यात येते. अजूनही चंद्रपूर, धुळे व यवतमाळ जिल्हयात वर्षश्राद्धाला डुक्कर बळी देण्याची प्रथा रूढ असल्याचे दिसून येते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने मद्यपान करणे सहज प्रवृत्ती असते.

ज्या भटक्या–विमुक्त जाती–जमाती आहेत, त्या त्या जाती जमातींची बोली भाषा एकच एक नाही तिच्यामध्ये विविधता आढळते. काहींच्या बोलीभाषा हया सांकेतिक स्वरूपाच्या आहेत. नंदीवाले समाजाची बोली भाषा तेलगु आहे. तर बंजारा–गोर बोली, छप्परबंद–राजस्थानी, कटबु–मराठी, कंजारभाटा–चौराशी, पारधी–गुजराथी, जोशी–मराठी, मांग गारूडी–कानडी, धनगर–मराठी, रजपूत भामटा–डागुरी, हेळवी–तेलगू, बेरड–कन्नड, वासुदेव–मराठी व बहुरूपी–मराठी इत्यादी भाषा बोलल्या जातात. ब–याच भाषांमध्ये मराठी बोलींचे मिश्रण आढळते. ज्या ज्या प्रदेशात जाती–जमातींचा वावर आहे तिथला प्रदेश बोलींचा प्रभाव त्यांच्या बोलींवर आढळतो. उदा.–पावरा भिल्ल–पावरी भिल्ली भाषा बोलली जाते. गुजराथी भाषेचा तिच्यावर पगडा आहे.

भटक्या विमुक्त जाती–जमातीचे अंतरंग पाहिल्यानंतर एक गोष्ट स्पष्ट होते की श. गो. देवगांकर म्हणतात त्याप्रमाणे, "सर्व जाती–जमातींच्या संस्कृतीचा अंतःप्रवाह आणि सामाजिक मूल्ये ही समान आहेत. किंबहुना एकच आहेत. केवळ व्यावसायिक विशेशीकरणात भेद आहेत. विविध रंग आणि सुगंध असलेल्या फुलांचा जसा सुंदर पुष्प गुच्छ असावा, तसाच भारत हा विविध जाती–जमातींचा एक सुंदर पुष्पगुच्छ आहे."[३]

समारोप :–

परंपरागत वर्णव्यवस्थेतून उद्‌भवलेल्या भटक्या विमुक्त जाती–जमाती आजही दारिद्रयात, अज्ञानात, अंधश्रद्धेत भरडत आहेत. स्वतंत्र भारत देशामध्ये सुद्धा त्यांच्या प्रश्नांना आपण न्याय देऊ शकलो नाही. ही खरी शोकांतीका आहे. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक प्रश्नांची सोडवणूक शासन्याच्या पातळीवर होऊन सगळया जाती–जमातींना मुख्य प्रवाहात आणणे हे प्रमुख ध्येय आपण ठेवले पाहिजे. इतर भारतीय नागरिकांप्रमाणे त्यांनाही न्याय हक्काची जाणीव करून देऊन विकासाच्या प्रक्रियेत सक्रिय करणे गरजेचे आहे. त्यासाठी अशा राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्रातून त्यांच्या समस्त प्रश्नांचा ऊहापोह होणे अपेक्षित आहे. त्याला यश येताना दिसते आहे.

संदर्भ :–

१. डॉ. बाळासाहेब चव्हाण, महाराष्ट्रातील भटका समाज व त्यांच्या साहित्याचे स्वरूप, ज्योतीचंद्र पाब्लिकेशन, लातूर, प्रथमावृत्ती २०११, पृष्ठ–११.
२. तत्रैव पृ. १२.

३. डॉ. रामनाथ चव्हाण, जाती आणि जमाती, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, आवृत्ती तिसरी, २०००, पृष्ठ१३.
४. प्रा. डॉ. नागनाथ कदम, महाराष्ट्रातील भटका समाज: संस्कृती व साहित्य, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम
५. आवृत्ती १९९९ , पृष्ठ –१२.
६. डॉ. धोंडीराम वाडकर, गोल्ला समाजाचा इतिहास, पद्मगंधा प्रकाशन, जानेवारी २००८, पृ. १०८.
७. डॉ. बाबासाहेब चव्हाण, महाराष्ट्रातील भटका समाज व त्याच्या साहित्याचे स्वरूप, तत्रैव, पृ. ४०.
८. डॉ. एस. जी. देवगांवकर, महाराष्ट्रातील निवडक जाती–जमाती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, दुसरी
९. आवृत्ती, प्रस्तावना, पृष्ठ –१२.